ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# पर्यावरणीय प्रश्न आणि माध्यमांचे स्वरुप


समीर इनामदार
संशोधक विद्यार्थी, सोलापूर विद्यापीठ सोलापूर
पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभाग

**सारांश :-**

पर्यावरण हा विषय दिवसेंदिवस बिकट होत चालला असताना माध्यमे या प्रश्नांकडे कोणत्या स्वरुपात पाहत आहेत, माध्यमे काळानुसार बदलत आहेत किंवा नाहीत, माध्यमे कोणते पर्यावरणाचे प्रश्न हाताळत आहेत, हे पाहणे सद्यपरिस्थितीत महत्वाचे ठरते आहे. पर्यावरणीय प्रश्नांची उकल माध्यमांच्या द्वारे कितपत होते आहे, या प्रश्नाला माध्यमे किती न्याय देतात हा खरा प्रश्न आहे. माध्यमे ही लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्याची साधने मानली जातात. पर्यावरणीय संवाद साधण्याची माध्यमे ही प्रमुख साधने आहेत. काही इंग्रजी माध्यमे सोडली तर इतर प्रादेशिक माध्यमांचे या प्रश्नाकडे दुर्लक्षच झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या प्रश्नाकडे कित्येक माध्यमांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते. माध्यमे ही अधिकाधिक लोकांपर्यंत जातात. लोकांना पर्यावरणविषयक वाचनाची आवड आहे. अशा स्थितीत लोकांना जागृत करणे, त्यांना पर्यावरणीय प्रश्नाची जाणीव करुन देणे हे माध्यमांचे काम आहे.

## प्रस्तावना

अमेरिकेच्या जीवशास्त्रज्ञ रसेश कार्सन (१९०७–१९६४) यांनी १९६२ साली सायलेंट स्प्रिंग हे पुस्तक लिहिले. त्यानंतर गेल्या ५० वर्षात पर्यावरण समस्या, सामाजिक, राजकीय, औद्योगिक मानसिकता बदलेलेली नाही. १९६० पासून पर्यावरणवादाची सामाजिक चळवळ निर्माण झाली. जगभरात पर्यावरण विषयाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढते आहे. भारतात मात्र या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. पूर्वी असणारा मानव आणि निसर्ग हा संबंध जवळपास नष्ट झाल्यात जमा आहे. नदीत सोडण्यात येणारे पाणी, वन्यप्राण्यांची शिकार, जंगलतोड या गोष्टींकडे फार काळजीपूर्वक पाहिले जाते असे नाही. खुल्या अर्थव्यवस्थेने पर्यावरणाची अवस्था आणखी बिकट झाली आहे. त्याचवेळी चंगळवाद, मनोरंजन, वैयक्तिक प्रश्न याकडे माध्यमांचे अधिक लक्ष्य आहे. माध्यमे पर्यावरणीय प्रश्नांना दुय्यम स्थान देत आहेत. शासनही या सर्वच प्रकाराकडे मख्खपणे पाहते आहे. भारतामधील अंतर्गत उत्पादनाच्या केवळ ०.००१२ टक्के इतका वाटा पर्यावरण राखण्यासाठी वापरला जातो आहे. शासकीय अनास्था विकासाला पर्यावरण रक्षणापेक्षा अधिक स्थान देते, हे समोर आले आहे.




## माध्यमांची जबाबदारी

जगभरासह देशातील आणि महाराष्ट्रातील घडामोडींसाठी माध्यमे हा लोकांसमोरचा मोठा पर्याय आहे. याविषयी घेण्यात आलेल्या विविध सर्वेक्षणातून हे सिद्धही झाले आहे. ८० टक्के माणसांना दूरचित्रवाणीतून, ५० टक्के माणसांना वृत्तपत्रातून, २० टक्के व्यक्तींना इंटरनेटद्वारे तर १८ टक्के लोकांना रेडिओद्वारे ही माहिती कळते. भारतीय मुद्रितमाध्यमे पर्यावरणविषयक बातम्यांना केवळ १.५ टक्के इतके नगण्य स्थान देतात. प्रादेशिक माध्यमांमध्ये हे स्थान याहूनही कमी आहे. लोकप्रिय विषयांच्या तुलनेत पर्यावरणविषयक बातम्यांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा वार्तांकनाला प्रोत्साहन देण्याचे फारसे प्रयत्न होत नाहीत. शासन, जनता, स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये दुवा राखण्याचे काम पर्यावरण पत्रकारिता करु शकते.

## पर्यावरणीय प्रश्न

कित्येक माध्यमात आजही स्वतंत्र असे पर्यावरण बीट नाही. काही बोटावर मोजण्याइतकी वर्तमानपत्रे सोडली तर अद्यापही पर्यावरणाच्या प्रश्नांना पहिल्या पानावर स्थान मिळत नाही. पर्यावरणाचे प्रश्न माध्यमांसाठी दुय्यम बाब राहिली आहे. जागतिक मंदीमुळे अनेक पत्रकारांना आपल्या नोकऱ्या गमावाव्या लागल्या, त्यात सर्वात प्रथम अशा विकासविषयक बातम्या लिहिणाऱ्या, पर्यावरण पत्रकारांचा बळी देण्यात आला. यावरुन माध्यमे अशा विषयांकडे कशापद्धतीने पाहतात, हे लक्षात येते. माध्यमांचा या विषयाकडे पाहण्याचा कल कसा आहे, ती पर्यावरणीय प्रश्नांना किती  महत्व देतात हे लक्षात येते. पत्रकारांना धारणाक्षमता, जैव वैविध्य, पाणी, जंगल, जमीन, वन्य जीव, हवामान बदल, प्रदूषण, कृषी, लोकसंख्या, नागरीकरण, आरोग्य अशा विविधांगी विषयांमधून पर्यावरण पत्रकारिता करता येते. जगभरात या प्रश्नाविषयी विविध संस्था, गैरसरकारी संघटना आंदोलन करीत असतात. पर्यावरणाचे प्रश्न लोकांसमोर मांडत असतात. या विषयावर अनेक संशोधक संशोधनही करतात. जगभरात दरवर्षी अशुद्ध पाण्यामुळे वाढती रोगराई, त्यामुळे होणारे मृत्यू, पर्यावरणीय बदलामुळे निसर्गचक्रात होत असलेली विविधता, घनकचरा, ई–कचऱ्यामुळे उद्भवत असलेल्या समस्या, वाढती लोकसंख्या, नागरीकरणामुळे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रश्न, वन्य जीवांची होत असलेली कत्तल, जैववैविध्यांची कमालीची घट, विविध देशात याबाबत घडणाऱ्या घटना, चर्चा, विविध परिषदा, समस्येचे समाधान या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. महाराष्ट्राच्या एखाद्या खेड्यातील समस्या ही जगभराची समस्या ठरु शकते. म्हणून प्रत्येक समस्येकडे तितक्याच गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

## पर्यावरण आणि जैवव्यवस्था

पर्यावरण आणि जैवव्यस्थेची व्यापत्ती क्लीष्ट आहे. व्यक्तीगत आवडीनिवडी, आदिवासींचे हक्क, मानवाचे सामाईक स्त्रोत अशा अनेक बाबींचा यात समावेश आहे. मानवाद्वारे निसर्गात बदल घडवून आणण्याचे प्रमाण अत्यंत धोकादायक आहे. पर्यावरण हानीची समस्या केवळ तांत्रिक नसून ती आधुनिक जगाच्या जीवनचक्रातून उगम पावलेली आहे आणि तिचा सर्वात मुलभूत विश्वास आहे तो मेटाफिजीक्स, असे तत्वेवेते ई. एफ. शुमाकर यांचे मत होते.

२००६ साली टाईम्स ऑफ इंडियाने वार्तांकनाचा भाग म्हणून केलेल्या सर्वेक्षणानुसार पर्यावरणाच्या सध्याच्या स्थितीला ८१ टक्के लोक राजकीय अज्ञान आणि हस्तक्षेपाला दोषी धरतात. पर्यावरणाच्या नुकसानीचा राजकारण्यांना काहीही पत्ता नसल्याचे ४६ टक्के लोकांनी सांगितले. ३५ टक्के नागरिकांच्या मते लाकूड माफिया, तस्कर यांच्याशी राजकारण्यांशी लागेबांधे आहेत.

## जैवविविधतेचा जहास

भारतातले जैववैविध्य मोठ्या प्रमाणात नष्ट होते आहे. प्राण्यांच्या ३६ प्रजाती, पक्ष्यांच्या ७२ प्रजाती, पक्ष्यांच्या १३३६ प्रजाती धोक्यात आणि धोक्याच्या उंबरठ्यावर आहेत. या प्रजाती दिसेनाशा झाल्या आहेत.  हवामानबदलाच्या संदर्भात भारताच्या नैत्य मोसमी पावसावर होणाऱ्या परिणामाविषयी लोकसभेत १० मार्च २०१० रोजी उपस्थित प्रश्नाला उत्तर देताना पृथ्वीविज्ञान खात्याच्या मंत्र्यांनी निष्कर्षाची माहिती दिली होती. १६३१ ते १६६४ या कालावधीत भारतातील नैत्य मोसमी पाऊस जवळपास ४ टक्के इतका कमी झाला. भारताच्या मध्यभागातील प्रचंड पावसाच्या घटना (दररोज १० से. मी. हून अधिक) दरवर्षी एक टक्क्याने वाढत आहेत. मध्यम आणि कमी पावसाच्या घटना (दररोज १ ते ५ से. मी.) गेल्या ५० वर्षात याच दराने कमी होत आहेत.

## पर्यावरण पत्रकारितेकडे पाहण्याच्या दृष्टीकोन

पर्यावरण पत्रकार लायला बावडम यांच्या अनुसार भारतीय पत्रकारांचा पर्यावरण पत्रकारितेकडे पाहण्याचा दृष्टीकोन फारसा चांगला नाही. त्यांच्या मते पर्यावरण पत्रकारिता हे कमीपणाची पत्रकारिता मानली गेली आहे. कुंदा दीक्षित यांच्या अनुसार अनेकांना पत्रकारिता आणि कार्यकर्ता यांच्यातील फरक अजून समजला नाही. या दोघांमध्ये अत्यंत सूक्ष्म अशी रेषा आहे. ती पुसली जाऊ नये. पेज थ्री जर्नलिझम ही मोठी मानली गेली असल्याने पर्यावरण पत्रकारितेकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन योग्य नसल्याच्या त्या म्हणतात. गोपीकृष्ण वारियर यांच्या अनुसार १६६१ साली झालेल्या जागतिकीकरणानंतर पर्यावरण पत्रकारितेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. विकास पत्रकारिता ही विकासाला मारक असल्याची भूमिका या पत्रकारितेकडे बघण्याची झाली. सुनीता नारायणन यांच्या मते पर्यावरण पत्रकारिता ही सर्वात गंभीर पत्रकारिता आहे. श्रीमंतापासून गरिबांपर्यंतचे प्रश्न सोडविण्याची धमक या पत्रकारितेमध्ये आहे. केया आचार्या यांच्या अनुसार १६६० पूर्वी बागकाम, वाघ, झाडे हेच पर्यावरण होते. अनिल अग्रवाल यांनी डाऊन टू अर्थ हे पर्यावरणाला वाहिलेले मासिक काढले आणि या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. केवळ पर्यावरणीय योजनाच नव्हे तर पाणी, भूसंपादन, वायू, नैसर्गिक अपारंपारिक ऊर्जा यांचाही समावेश यात झालाय. सुरिंदर शर्मा यांच्या अनुसार पर्यावरण पत्रकारिता म्हणजे अगदी गंमत.

## संदर्भ


1) शिंत्रे संतोष, भारतीय निसर्ग–पर्यावरण पत्रकारिता, सकाळ प्रकाशन, प्रथमावृत्ती जानेवारी २०१३
2) चौधरी कांचन (संपादक), योजना (मराठी मासिक), बी–७०१, केंद्रीय सदन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, जून २०१३,
3) तंतरपाळे राजेंद्र रमेशराव, पर्यावरण रक्षणार्थ भारताचे प्रयत्न, योजना (मराठी मासिक), जून–२०१३
4) देऊळगावकर अतुल, विश्वाचे आर्त, लोकवाङमयगृह प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट २०१४
5) घोपरडे अजित, संथ वाहते, जीवनदायी नद्यांचे आजचे वास्तव, रोहन प्रकाशन, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर २०१०
6) असद आर. रहमानी, राजू कसंबे, सुजित नरवडे, प्रमोद पाटील, नूर आय. खान, बॉम्बे नचरल हिस्ट्री सोसायटी आणि महाराष्ट्रा राज्य जैवविविधता  मंडळ, आयएसबीएन ८१–६०२६४७–६–६, २०१४
7)Acharya keya, Norohnha fredrick, The Green Pen, Sage Publication, New Delhi, First Edition, 2010

